# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**अत्यंत तातडीचे/महत्वाचे**

क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/२९०/२०२०
दिनांक : १८/०९/२०२०

प्रति,
प्राचार्य / विभागप्रमुख,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग

**विषय : स्मार्टफोन व इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही, अशा विद्यार्थ्यांची परीक्षा ऑफलाईन घेण्याकरीता अशा विद्यार्थ्यांची माहिती पाठविण्याबाबत.**

संदर्भ : परिपत्रक क्रमांक संगाबाअवि-३/संपमूमं/ २७६ /२०२०, दिनांक १२.०९.२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सदर परिपत्रकातील भाग-१ मधील अनुक्रमांक २ पुढीलप्रमाणे आहे.

"ज्या विद्यार्थ्यांकडे उपरोक्तप्रमाणे सुविधा नसतील अशा विद्यार्थ्यांनी ते शिकत असलेल्या महाविद्यालयाशी संपर्क साधून ऑफलाईन पद्धतीने विद्यार्थ्यास जवळ असलेल्या संलग्नित महाविद्यालयात आपण परीक्षा देणार आहात याची सूचना शिकत असलेल्या महाविद्यालयातील प्राचार्यांना दि.२२ सप्टेंबर, २०२० पर्यंत द्यावी. महाविद्यालयातील प्राचार्यांनी ज्या महाविद्यालयाची विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी मागणी केली त्या प्राचार्यांशी संपर्क साधून अशा विद्यार्थ्यांची ऑफलाईन परीक्षेची व्यवस्था सदर महाविद्यालयात करावी व त्याची माहिती विद्यापीठास दिनांक २५ सप्टेंबर, २०२० पर्यंत खालील प्रपत्रात द्यावी, जेणेकरून विद्यापीठाला मागणी केलेल्या महाविद्यालयात M.C.Q.-Multiple Choice Question पद्धतीची हार्डकॉपी प्रश्नपत्रिका पाठविता येईल. अशा विद्यार्थ्यांनी वेळापत्रकानुसार सदर महाविद्यालयात जावून विद्यापीठाद्वारे पुरविण्यात आलेल्या OMR Sheet वर प्रश्नांची उत्तरे अंकित करावयाची आहेत."

| विद्यार्थी शिकत असलेल्या महाविद्यालयाचे चे नांव | विद्यार्थ्यांचे नांव | परीक्षा व सत्र | विद्यार्थ्यांचा परीक्षा क्रमांक | विषयांची नावे | ज्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांला परीक्षा द्यावयाची आहे त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

ज्या विद्यार्थ्यांकडे घरुन ऑनलाईन परीक्षा देण्याची व्यवस्था नाही, अशा विद्यार्थ्यांची माहिती उपरोक्त तक्त्यामध्ये दिनांक २५ सप्टेंबर, २०२० पर्यंत exam2020@sgbau.ac.in मेलवर excell Sheet मध्ये पाठविण्यात यावी.

धन्यवाद.

**(टिप- महाविद्यालयाला शक्य असल्यास आपल्या केंद्रावर अशा विद्यार्थ्यांची ऑनलाईन प्रणालीद्वारे संगणकावर परीक्षा घेण्याची व्यवस्था करावी.)**

आपला,

(डॉ.हेमंत आर.देशमुख)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

103narwade Sir